माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.२१०८४६/२१/अ.क्र.५८१६/२४**
**क्र. मुमाआ/नों.क्र.२१०८८६/२१/अ.क्र.५८१७/२४**

श्री.भारत पुरोहित

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व का.) डी विभाग
सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय, डी विभाग, नाना चौक,
जोबनपुत्र कंपाऊंड, ग्रँट रोड (प.), मुंबई-४०० ००७.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत व का.) डी विभाग
सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय, डी विभाग, नाना चौक,
जोबनपुत्र कंपाऊंड, ग्रँट रोड (प.), मुंबई-४०० ००७.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७-११-२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित. ट्रॅक रिपोर्टप्रमाणे नोटीस दि.३०.१०.२०२४ रोजी प्राप्त. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २५-०८-२०२० | १८-०९-२०२० | २७-११-२०२० | २४-१२-२०२० |

अपिलकर्तानी माहिती अर्ज दि.२५-०८-२०२० नुसार रसधारा गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या संबंधित माहितीची मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) डी विभाग यांनी दि.१८-०९-२०२० अन्वये अपिलकर्तांना निरीक्षणासाठी कार्यालयात उपस्थित रहावे असे उत्तर दिले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी (इ. व का.) डी विभाग यांचे समोर सुनावणी दरम्यान अपिलकर्तांनी नमूद केले की, जन माहिती अधिकारींनी माहिती स्वाक्षरीविना देण्यात आली आहे. प्रथम अपिलीय अधिकारींनी दि.२४-१२-२०२० रोजीचे आदेशान्वये जन माहिती अधिकारींनी अपिलकर्तास उचित व विहीत कालावधीत उत्तर दिले आहे असे नमूद करुन अपिल निकाली काढले.

**क्र. मुमाआ/नों.क्र.२१०८४६/२१/अ.क्र.५८१६/२४**
**क्र. मुमाआ/नों.क्र.२१०८८६/२१/अ.क्र.५८१७/२४**



अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि.०१-०३-२०२१ नुसार पूर्ण माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता अनुपस्थित. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) डी विभाग आणि प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ. व का.) डी विभाग उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) डी विभाग यांनी सादर केले की, अपिलकर्तास दि. ११-११-२०२० रोजी शासकीय शुल्क भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) डी विभाग यांनी आयोगास सादर केले की, सदर विषयाबाबत अपलिकर्ता यांनी मा.लोक आयुक्त यांचेकडे सुध्दा तक्रार केली होती आणि मा.लोक आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार अपिलकर्तास कागदपत्रांची छायांकित प्रत दि.२९-१२-२०२२ रोजी विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

जन माहिती अधिकारींनी अपिलकर्तांना माहिती दिली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक : ०७-११-२०२४

State Information Commission Maharashtra

(डॉ.प्रदीप व्यास)
राज्य मुख्य माहिती आयुक्त